.. Dasabodh by Samartha Ramadas Swami Chapter 18 ..

॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक १८ ॥

॥ दशक अठरावा : बहुजिनसी ॥ १८ ॥

समास पहिला : बहुदेवस्थाननाम

॥ श्रीराम ॥

तुज नमूं गजवदना । तुझा महिमा कळेना ।
विद्या बुद्धि देसी जना । लाहानथोरांसी ॥ १ ॥
तुज नमूं सरस्वती । च्यारी वाचा तुझेन स्फूर्ती ।
तुझें निजरूप जाणती । ऐसे थोडे ॥ २ ॥
धन्य धन्य चतुरानना । तां केली सृष्टीरचना ।
वेद शास्त्रें भेद नाना । प्रगट केले ॥ ३ ॥
धन्य विष्णु पाळण करिसी । येकांशें सकळ जीवांसी ।
वाढविसी वर्तविसी । जाणजाणों ॥ ४ ॥
धन्य धन्य भोळाशंकर । जयाच्या देण्यास नाहीं पार ।
रामनाम निरंतर । जपत आहे ॥ ५ ॥
धन्य धन्य इंद्रदेव । सकळ देवांचाहि देव ।
इंद्रलोकींचें वैभव । काये म्हणौनि सांगावें ॥ ६ ॥
धन्य धन्य येमधर्म । सकळ जाणती धर्माधर्म ।
प्राणीमात्राचें वर्म । ठाई पाडिती ॥ ७ ॥
वेंकटेंसीं महिमा किती । भले उभ्यां अन्न खाती ।
वडे धिरडीं स्वाद घेती । आतळस आपालांचा ॥ ८ ॥
धन्य तूं वो बनशंकरी । उदंड शाखांचिया हारी ।
विवरविवरों भोजन करी । ऐसा कैंचा ॥ ९ ॥
धन्य भीम गोलांगुळा । कोरवड्यांच्या उदंड माळा ।
दहि वडे खातां सकळां । समाधान होये ॥ १० ॥
धन्य तूं खंडेराया । भंडारें होये पिंवळी काया ।
कांदेभरीत रोटगे खाया । सिद्ध होती ॥ ११ ॥
धन्य तुळजाभोवानी । भक्तां प्रसन्न होते जनीं ।
गुणवैभवास गणी । ऐसा कैंचा ॥ १२ ॥
धन्य धन्य पांडुरंग । अखंड कथेचा होतो धिंग ।
तानमानें रागरंग । नाना प्रकारीं ॥ १३ ॥
धन्य तूं गा क्षत्रपाळा । उदंड जना लाविला चाळा ।
भावें भक्ति करितां फळा । वेळ नाहीं ॥ १४ ॥
रामकृष्णादिक अवतार । त्यांचा महिमा अपार ।
उपासनेस बहुत नर । तत्पर जाले ॥ १५ ॥
सकळ देवांचे मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ ।
भूमंडळीं भोग सकळ । त्यासीच घडे ॥ १६ ॥
नाना देव होऊन बैसला । नाना शक्तिरूपें जाला ।
भोक्ता सकळ वैभवाला । तोचि येक ॥ १७ ॥
याचा पाहावा विचार । उदंड लांबला जोजार ।
होती जाती देव नर । किती म्हणोनि ॥ १८ ॥
कीर्ति आणि अपकीर्ति । उदंड निंदा उदंड स्तुती ।
सर्वत्रांची भोगप्राप्ती । अंतरात्म्यासीच घडे ॥ १९ ॥
कोण देहीं काये करितो । कोण देहीं काये भोगितो ।
भोगी त्यागी वीतरागी तो । येकचि आत्मा ॥ २० ॥
प्राणी साभिमानें भुलले । देह्याकडे पाहात गेले ।
मुख्य अंतरात्म्यास चुकलें । अंतरीं असोनी ॥ २१ ॥
आरे या आत्मयाची चळवळ पाहे । ऐसा भूमंडळीं कोण आहे ।
अगाध पुण्यें अनुसंधान राहे । कांहींयेक ॥ २२ ॥
त्या अनुसंधानासरिसें । जळोनी जाईजे किल्मिषें ।
अंतरनिष्ठ ज्ञानी ऐसे । विवरोन पाहाती ॥ २३ ॥
अंतरनिष्ठ तितुके तरले । अंतरभ्रष्ट तितुके बुडाले ।
बाह्यात्कारें भरंगळले । लोकाचारें ॥ २४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
बहुदेवस्थाननिरूपणनाम समास पहिला ॥ १ ॥ १८.१

समास दुसरा : सर्वज्ञसंगनिरूपण

॥ श्रीराम ॥

नेणपणें जालें तें जालें । जालें तें होऊन गेलें ।
जाणतेपणें वर्तलें । पाहिजे नेमस्त ॥ १ ॥
जाणत्याची संगती धरावी । जाणत्याची सेवा करावी ।
जाणत्याची सद्बुद्धि घ्यावी । हळुहळु ॥ २ ॥
जाणत्यापासीं लेहों सिकावें । जाणत्यापासीं वाचूं सिकावें ।
जाणत्यापासीं पुसावें । सकळ कांहीं ॥ ३ ॥
जाणत्यास करावा उपकार । जाणत्यास झिजवावें शरीर ।
जाणत्याचा पाहावा विचार । कैसा आहे ॥ ४ ॥
जाणत्याचे संगतीनें भजावें । जाणत्याचे संगतीनें झिजावें ।
जाणत्याचे संगतीनें रिझावें । विवरविवरों ॥ ५ ॥
जाणत्यापासीं गावें गाणें । जाणत्यापासीं वाजवणें ।
नाना आळाप सिकणें । जाणत्यापासीं ॥ ६ ॥
जाणत्याचे कासेसी लागावें । जाणत्याचें औषध घ्यावें ।
जाणतां सांगेल तें करावें । पथ्य आधीं ॥ ७ ॥
जाणत्यापासीं परीक्षा सिकणें । जाणत्यापासीं तालिम करणें ।
जाणत्यापासीं पोहणें । अभ्यासावें ॥ ८ ॥
जाणता बोलेले तैसें बोलावें । जाणता सांगेल तैसें चालावें ।
जाणत्याचें ध्यान घ्यावें । नाना प्रकरीं ॥ ९ ॥
जाणत्याच्या कथा सिकाव्या । जाणत्याच्या युक्ति समजाव्या ।

जाणत्याच्या गोष्टी विवराव्या । सकळ कांहीं ॥ १० ॥
जाणत्याचे पेंच जाणावे । जाणत्याचे पीळ उकलावे ।
जाणता राखेल तैसे राखावे । लोक राजी ॥ ११ ॥
जाणत्याचे जाणावे प्रसंग । जाणत्याचे घ्यावे रंग ।
जाणत्याचे स्फूर्तीचे तरंग । अभ्यासावे ॥ १२ ॥
जाणत्याचा साक्षेप घ्यावा । जाणत्याचा तर्क जाणावा ।
जाणत्याचा उल्लेख समजावा । न बोलतांचि ॥ १३ ॥
जाणत्याचें धूर्तपण । जाणत्याचें राजकारण ।
जाणत्याचें निरूपण । ऐकत जावें ॥ १४ ॥
जाणत्याचीं कवित्वें सिकावीं । गद्यें पद्यें वोळखावी ।
माधुर्यवचनें समजावीं । अंतर्यामीं ॥ १५ ॥
जाणत्याचें पाहावे प्रबंद । जाणत्याचे वचनभेद ।
जाणत्याचे नाना संवाद । बरे शोधावे ॥ १६ ॥
जाणत्याची तीक्षणता । जाणत्याची सहिष्णता ।
जाणत्याची उदारता । समजोन घ्यावी ॥ १७ ॥
जाणत्याची नाना कल्पना । जाणत्याची दीर्घ सूचना ।
जाणत्याची विवंचना । समजोन घ्यावी ॥ १८ ॥
जाणत्याचा काळ सार्थक । जाणत्याचा अध्यात्मविवेक ।
जाणत्याचे गुण अनेक । आवघेच घ्यावे ॥ १९ ॥
जाणत्याचा भक्तिमार्ग । जाणत्याचा वैराग्ययोग ।
जाणत्याचा अवघा प्रसंग । समजोन घ्यावा ॥ २० ॥
जाणत्याचें पाहावें ज्ञान । जाणत्याचें सिकावें ध्यान ।
जाणत्याचें सूक्ष्म चिन्ह । समजोन घावें ॥ २१ ॥
जाणत्याचें अलिप्तपण । जाणत्याचें विदेहलक्षण ।
जाणत्याचें ब्रह्मविवरण । समजोन घ्यावें ॥ २२ ॥
जाणता येक अंतरात्मा । त्याचा काये सांगावा महिमा ।
विद्याकळागुणसीमा । कोणें करावी ॥ २३ ॥
परमेश्वरांचे गुणानुवाद । अखंड करावा संवाद ।
तेणेंकरितां आनंद । उदंड होतो ॥ २४ ॥
परमेश्वरें निर्मिलें तें । अखंड दृष्टीस पडतें ।
विवरविवरों समजावें तें । विवेकी जनीं ॥ २५ ॥
जितुकें कांहीं निर्माण जालें । तितुकें जगदेश्वरें निर्मिलें ।
निर्माण वेगळें केलें । पाहिजे आधीं ॥ २६ ॥
तो निर्माण करतो जना । परी पाहों जातां दिसेना ।
विवेकबळें अनुमाना । आणीत जावा ॥ २७ ॥
त्याचें अखंड लागतां ध्यान । कृपाळुपणें देतो आशन ।
सर्वकाळ संभाषण । तदांशेंचि करावें ॥ २८ ॥
ध्यान धरीना तो अभक्त । ध्यान धरील तो भक्त ।
संसारापासुनी मुक्त । भक्तांस करी ॥ २९ ॥
उपासनेचे सेवटीं । देवां भक्तां अखंड भेटी ।
अवुभवी जाणेल गोष्टी । प्रत्ययाची ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सर्वज्ञसंगनिरूपणनाम समास दुसरा ॥ २ ॥ १८.२

समास तिसरा : निस्पृहशिकवण

॥ श्रीराम ॥

दुल्लभ शरीरीं दुल्लभ आयुष्य । याचा करूं नये नास ।
दास म्हणे सावकास । विवेक करावा ॥ १ ॥
न पाहातां उत्तम विवेक । अवघा होतो अविवेक ।
अविवेकें प्राणी रंक । ऐसा दिसे ॥ २ ॥
हें आपलें आपण केलें । आळसें उदास नागविलें ।
वाईट संगतीनें बुडविलें । देखत देखतां ॥ ३ ॥
मूर्खपणाचा अभ्यास जाला । बाष्कळपणें घातला घाला ।
काम चांडाळा उठिला । तरुणपणीं ॥ ४ ॥
मूर्ख आळसी आणि तरुणा । सर्वांविषीं दैन्यवाणा ।
कांहीं मिळेना कोणा । काये म्हणावें ॥ ५ ॥
जें जें पाहिजे तें तें नाहीं । अन्नवस्त्र तेंहि नाहीं ।
उत्तम गुण कांहींच नाहीं । अंतर्यामीं ॥ ६ ॥
बोलतां येना बैसतां येना । प्रसंग कांहींच कळेना ।
शरीर मन हें वळेना । अभ्यासाकडे ॥ ७ ॥
लिहिणें नाहीं वाचणें नाहीं । पुसणें नाहीं सांगणें नाहीं ।
नेमस्तपणाचा अभ्यास नाहीं । बाष्कळपणें ॥ ८ ॥
आपणांस कांहींच येना । आणी सिकविलेंहि मानेना ।
आपण वेडा आणि सज्जना । बोल ठेवी ॥ ९ ॥
अंतरी येक बाहेरी येक । ऐसा जयाचा विवेक ।
परलोकाचें सार्थक । कैसें घडे ॥ १० ॥
आपला संसार नासला । मनामधें प्रस्तावला ।
तरी मग अभ्यास केला । पाहिजे विवेकाचा ॥ ११ ॥
येकाग्र करूनिया मन । बळेंचि धरावें साधन ।
येत्नीं आळसाचें दर्शन । होऊंच नये ॥ १२ ॥
अवगुण अवघेचि सांडावे । उत्तम गुण अभ्यासावे ।
प्रबंद पाठ करीत जावें । जाड अर्थ ॥ १३ ॥
पदप्रबंद श्लोकप्रबंद । नाना धाटी मुद्रा छंद ।
प्रसंगज्ञानेंचि आनंद । होत आहे ॥ १४ ॥
कोणे प्रसंगीं काये म्हणावें । ऐसें समजोन जाणावें ।
उगेंचि वाउगें सिणावें । कासयासी ॥ १५ ॥
दुसऱ्याचें अंतर जाणावें । आदर देखोन म्हणावें ।
जें आठवेल तें गावें । हें मूर्खपण ॥ १६ ॥
जयाची जैसी उपासना । तेंचि गावें चुकावेना ।
रागज्ञाना ताळज्ञाना । अभ्यासावें ॥ १७ ॥
साहित संगीत प्रसंग मानें । करावीं कथेंचीं घमशानें ।
अर्थांतर श्रवणमननें । काढीत जावें ॥ १८ ॥
पाठ उदंडचि असावें । सर्वकाळ उजळीत जावें ।
सांगितलें गोष्टीचें असावें । स्मरण अंतरीं ॥ १९ ॥
अखंड येकांत सेवावा । ग्रन्थमात्र धांडोळावा ।
प्रचित येईल तो घ्यावा । अर्थ मनीं ॥ २० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

निस्पृहशिकवणनिरूपणनाम समास तिसरा ॥ ३ ॥ १८.३

समास चौथा : देहदुर्लभनिरूपण

॥ श्रीराम ॥

देह्याकरितां गणेशपूजन । देह्याकरितां शारदावंदन ।
देह्याकरितां गुरु सज्जन । संत श्रोते ॥ १ ॥
देह्याकरितां कवित्वें चालती । देह्याकरितां अधेनें करिती ।
देह्याकरितां अभ्यासिती । नाना विद्या ॥ २ ॥
देह्याकरितां ग्रंथलेखन । नाना लिपीवोळखण ।
नाना पदार्थशोधन । देह्याकरितां ॥ ३ ॥
देह्याकरितां माहाज्ञानी । सिद्ध साधु ऋषी मुनी ।
देह्याकरितां तीर्थाटणीं । फिरती प्राणी ॥ ४ ॥
देह्याकरितां श्रवण घडे । देह्याकरितां मननीं पवाडे ।
देह्याकरितां देहीं आतुडे । मुख्य परमात्मा ॥ ५ ॥
देह्याकरितां कर्ममार्ग । देह्याकरितां उपासनामार्ग ।
देह्याकरितां ज्ञानमार्ग । भूमंडळीं ॥ ६ ॥
योगी वीतरागी तापसी । देह्याकरितां नाना सायासी ।
देह्याकरितां आत्मयासी । प्रगटणें घडे ॥ ७ ॥
येहलोक आणि परलोक । देह्याकरितां सकळ सार्थक ।
देहेंविण निरार्थक । सकळ कांहीं ॥ ८ ॥
पुरश्चरणें अनुष्ठानें । गोरांजनें धूम्रपानें ।
सीतोष्ण पंचाग्नी साधणें । देह्याकरितां ॥ ९ ॥
देह्याकरितां पुण्यसीळ । देह्याकरितां पापी केवळ ।
देह्याकरितां अनर्गळ । सुचिस्मंत ॥ १० ॥
देह्याकरितां अवतारी । देह्याकरितां वेषधारी ।
नाना बंडें पाषांडें करी । देह्याकरितां ॥ ११ ॥
देह्याकरितां विषयभोग । देह्याकरितां सकळ त्याग ।
होती जाती नाना रोग । देह्याकरितां ॥ १२ ॥
देह्याकरितां नवविधा भक्ती । देह्याकरितां चतुर्विधा मुक्ती ।
देह्याकरितां नाना युक्ती । नाना मतें ॥ १३ ॥
देह्याकरितां दानधर्म । देह्याकरितां नाना वर्म ।
देह्याकरितां पूर्वकर्म । म्हणती जनीं ॥ १४ ॥
देह्याकरितां नाना स्वार्थ । देह्याकरितां नाना अर्थ ।
देह्याकरितां होईजे वेर्थ । आणी धन्य ॥ १५ ॥
देह्याकरितां नाना कळा । देह्याकरितां उणा आगळा ।
देह्याकरितां जिव्हाळा । भक्तिमार्गाचा ॥ १६ ॥
नाना सन्मार्गसाधनें । देह्याकरितां तुटती बंधनें ।
देह्याकरितां निवेदनें । मोक्ष लाभे ॥ १७ ॥
देहे सकळामधें उत्तमु । देहीं राहिला आत्मारामु ।
सकळां घटीं पुरुषोत्तमु । विवेकी जाणती ॥ १८ ॥
देह्याकरितां नाना कीर्ती । अथवा नाना अपकीर्ती ।
देह्याकरितां होती जाती । अवतारमाळिका ॥ १९ ॥
देह्याकरितां नाना भ्रम । देह्याकरितां नाना संभ्रम ।
देह्याचेन उत्तमोत्तम । भोगिती पदें ॥ २० ॥
देह्याकरितां सकळ कांहीं । देह्याविण कांहीं नाहीं ।
आत्मा विरे ठाई ठाई । नव्हताच जैसा ॥ २१ ॥
देहे परलोकींचें तारूं । नाना गुणांचा गुणागरु ।
नाना रत्नांचा विचारु । देह्याचेनी ॥ २२ ॥
देह्याचेन गायेनकळा । देह्याचेन संगीतकळा ।
देह्याचेन अंतर्कळा । ठाई पडे ॥ २३ ॥
देहे ब्रह्मांडाचें फळ । देहे दुल्लभचि केवळ ।
परी या देह्यास निवळ । उमजवावें ॥ २४ ॥
देह्याकरितां लहानथोर । करिती आपुलाले व्यापार ।
त्याहिमधें लाहानथोर । कितीयेक ॥ २५ ॥
जे जे देहे धरुनी आले । ते ते कांहीं करून गेले ।
हरिभजनें पावन जाले । कितीयेक ॥ २६ ॥
अष्टधा प्रकृतीचें मूळ । संकल्परूपचि केवळ ।
नाना संकल्पें देहेफळ । घेऊन आलें ॥ २७ ॥
हरिसंकल्प मुळीं होता । तोचि फळीं पाहावा आतां ।
नाना देह्यांतरीं तत्वता । शोधितां कळे ॥ २८ ॥
वेलाचे मुळीं बीज । उदकरूप वेली समज ।
पुढें फळामधें बीज । मुळींच्या अंशें ॥ २९ ॥
मुळाकरितां फळ येतें । फळाकरितां मूळ होतें ।
येणेंकरितां होत जातें । भूमंडळ ॥ ३० ॥
असो कांहीं येक करणें । कैसें घडे देह्याविणें ।
देहे सार्थकीं लावणें । म्हणिजे बरें ॥ ३१ ॥
आत्म्याकरितां देहे जाला । देह्याकरितां आत्मा तगला ।
उभययोगें उदंड चालिला । कार्यभाग ॥ ३२ ॥
चोरून गुप्तरूपें करावें । तें आत्मयासी पडे ठावें ।
कर्तुत्व याचेन स्वभावें । सकळ कांहीं ॥ ३३ ॥
देह्यामधें आत्मा असतो । देहे पूजितां आत्मा तोषतो ।
देहे पीडितां आत्मा क्षोभतो । प्रत्यक्ष आतां ॥ ३४ ॥
देह्यावेग्ळी पूजा पावेना । देह्याविण पूजा फावेना ।
जनीं जनार्दन म्हणोनी जना । संतुष्ट करावें ॥ ३५ ॥
उदंड प्रगटला विचार । धर्मस्थापना तदनंतर ।
तेथेंच पूजेस अधिकार । पुण्यशरीरीं ॥ ३६ ॥
सगट भजन करूं येतें । तरी मूर्खपण आंगीं लागतें ।
गाढवासी पूजितां कळतें । काये त्याला ॥ ३७ ॥
पूज्य पूजेसी अधिकार । उगेचि तोषवावे इतर ।
दुखऊं नये कोणाचें अंतर । म्हणिजे बरें ॥ ३८ ॥
सकळ जगदांतरींचा देव । क्षोभता राहाव्या कोठें ठाव ।
जनावेगळा जनास उपाव । आणीक नाहीं ॥ ३९ ॥
परमेश्वराचे अनंत गुण । मनुष्यें काये सांगावी खूण ।
परंतु अध्यात्मग्रंथश्रवण । होतां उमजे ॥ ४० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
देहदुर्लभनिरूपणनाम समास चौथा ॥ ४ ॥ १८.४

समास पांचवा : करंटपरीक्षानिरूपण

॥ श्रीराम ॥
धान्य उदंड मोजिलें । परी त्या मापें नाहीं भक्षिलें ।
विवरल्यविण तैसें जालें । प्राणीमात्रासी ॥ १॥
पाठ म्हणतां आवरेना । पुसतां कांहींच कळेना ।
अनुभव पाहातां अनुमानास्र । मधें पडें ॥ २॥
शब्दरत्नें परीक्षावीं । प्रत्ययाचीं पाहोन घ्यावीं ।
येर ते अवघीं सांडावीं । येकीकडे ॥ ३॥
नावरूप आवघें सांडावें । मग अनुभवास मांडावें ।
सार असार येकचि करावें । हें मूर्खपण ॥ ४॥
लेखकें कुळ समजवावें । किंवा उगेंच वाचावें ।
येणें दृष्टांतें समजावें । कोणींतरी ॥ ५॥
जेथें नाहीं समजावीस । तेथें आवघी कुसमुस ।
पुसों जातां वसवस । वक्ता करी ॥ ६॥
नाना शब्द येकवटिले । प्रचीतीवीण उपाव केले ।
परी ते अवघेचि वेर्थ गेले । फडप्रसंगीं ॥ ७॥
पसेवरी वैरण घातलें । तांतडीनें जातें वोडिलें ।
तेणें पीठ बारीक आलें । हें तो घडेना ॥ ८॥
घांसामागें घांस घातला । आवकाश नाहीं चावायाला ।
अवघा बोकणा भरिला । पुढें कैसें ॥ ९॥
ऐका फडनिसीचें लक्षण । विरंग जाऊं नेदी क्षण ।
समस्तांचें अंतःकर्ण । सांभाळीत जावें ॥ १०॥
सूक्ष्म नामें सुखें घ्यावीं । तितुकीं रूपें वोळखावीं ।
वोळखोन समजवावीं । श्रोतयांसी ॥ ११॥
समशा पुरतां सुखी होती । श्रोते अवघे आनंदती ।
अवघे क्षणक्षणा वंदिती । गोसावियांसी ॥ १२॥
समशा पुरतां वंदिती । समशा न पुरतां निंदिती ।
गोसांवी चिणचिण करिती । कोण्या हिशेबें ॥ १३॥
शुध सोनें पाहोन घ्यावें । कसीं लाउनी तावावें ।
श्रवणमननें जाणावें । प्रत्ययासी ॥ १४॥
वैद्याची प्रचित येना । वेथा परती होयेना ।
आणी रागेजावें जना । कोण्या हिशेबें ॥ १५॥
खोटें कोठेंचि चालेना । खोटें कोणास मानेना ।
याकारणें अनुमाना । खरें आणावें ॥ १६॥
लिहिणें न येतां व्यापार केला । कांहीं येक दिवस चालिला ।
पुसता सुरनीस भेटला । तेव्हां खोटें ॥ १७॥
सर्व आवघें हिशेबीं ठावें । प्रत्यय साक्षीनें बोलावें ।
मग सुरनीसें काये करावें । सांगाना कां ॥ १८॥
स्वये आपणचि गुंते । समजावीस कैसी होते ।
नेणतां कोणीयेक ते । आपदों लागती ॥ १९॥
बळेंविण युद्धास गेला । तो सर्वस्वें नागवला ।
शब्द ठेवावा कोणाला । कोण कैसा ॥ २०॥
जे प्रचीतीस आलें खरें । तेंचि घ्यावें अत्यादरें ।
अनुभवेंविण जें उत्तरें । तें फलकटें जाणावीं ॥ २१॥
सिकऊं जातां राग चढे । परंतु पुढें आदळ घडे ।
खोटा निश्चय तात्काळ उडे । लोकामधें ॥ २२॥
खरें सांडुनी खोटें घेणें । भकाधेस काये उणें ।
त्रिभुवनीं नारायणे । न्याय केला ॥ २३॥
तो न्याय सांडितां सेवटीं । अवघें जगचि लागे पाठीं ।
जनीं भंडभांडों हिंपुटीं । किती व्हावें ॥ २४॥
अन्यायें बहुतांस पुरवलें । हें देखिलें ना ऐकिलें ।
वेडें उगेंचि भरीं भरलें । असत्याचे ॥ २५॥
असत्य म्हणिजे तेंचि पाप । सत्य जाणावें स्वरूप ।
दोहींमधें साक्षप । कोणाचा करावा ॥ २६॥
मायेमधें बोलणें चालणें साचें । माया नस्तां बोलणें कैंचें ।
याकारणें निशब्दाचें । मूळ शोधावें ॥ २७॥
वाच्यांश जाणोनि सांडावा । लक्ष्यांश विवरोन घ्यावा ।
याकारणें निशब्द मुळाचा गोवा । आढळेना ॥ २८॥
अष्टधा प्रकृती पूर्वपक्ष । सांडून अलक्षीं लावावें लक्ष ।
मननसीळ परम दक्ष । तोचि जाणे ॥ २९॥
नाना भूस आणि कण । येकचि म्हणणें अप्रमाण ।
रस चोवडिया कोण । शाहाणा सेवी ॥ ३०॥
पिंडीं नित्यानित्य विवेक । ब्रह्मांडीं सारासार अनेक ।
सकळ शोधूनियां येक । सार घ्यावें ॥ ३१॥
मायेकरितां कोणीयेक । अन्वय आणि वीतरेक ।
ते माया नस्तां विवेक । कैसा करावा ॥ ३२॥
तत्वें तत्व सर्व शोधावें । माहांवाकीं प्रवेशावें ।
आत्मनिवेदनें पावावें । समाधान ॥ ३३॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
करंटपरीक्षानिरूपणनाम समास पांचवा ॥ ५॥ १८.५

समास सहावा : उत्तमपुरुषनिरूपण

॥ श्रीराम ॥
नाना वस्त्रें नाना भूषणें । येणें शरीर शृंघारणें ।
विवेकें विचारें राजकरणें । अंतर शृंघारिजे ॥ ११॥
शरीर सुंदर सतेज । वस्त्रें भूषणें केले सज्ज ।
अंतरीं नस्तां च्यातुर्यबीज । कदापि शोभा न पवे ॥ २॥
तुंड हेंकाड कठोर वचनी । अखंड तोले साभिमानी ।
न्याय नीति अंतःकर्णीं । घेणार नाहीं ॥ ३॥
तऱ्हे सीघ्रकोपी सदा । कदापि न धरी मर्यादा ।
राजकारण संवादा । मिळोंचि नेणें ॥ ४॥
ऐसें लौंद बेइमानी । कदापि सत्य नाहीं वचनीं ।
पापी अपस्मार जनीं । राक्षेस जाणावें ॥ ५॥
समयासारिखा समयो येना । नेम सहसा चलेना ।
नेम धरितां राजकारणा । अंतर पडे ॥ ६॥
अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें ।
हटनिग्रहीं न पडावें । विवेकीं पुरुषें ॥ ७॥
बहुतचि करितां हट । तेथें येऊन पडेल तट ।

कोणीयेकाचा सेवट । जाला पाहिजे ॥ ८ ॥
बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभोवानी ।
परंतु विचार पाहोनी । कार्ये करणें ॥ ९ ॥
अखंडचि सावधाना । बहुत काये करावी सूचना ।
परंतु कांहीं येक अनुमाना । आणिलें पाहिजे ॥ १० ॥
समर्थापासीं बहुत जन । राहिला पाहिजे साभिमान ।
निश्चळ करूनियां मन । लोक असती ॥ ११ ॥
म्लेच दुर्जन उदंड । बहुतां दिसाचें माजलें बंड ।
याकार्णें अखंड । सावधान असावें ॥ १२ ॥
सकळकर्ता तो ईश्वरु । तेणें केला अंगिकारुं ।
तया पुरुषाचा विचारु । विरुळा जाणे ॥ १३ ॥
न्याय नीति विवेक विचार । नाना प्रसंगप्रकार ।
परीक्षिणें परांतर । देणें ईश्वराचें ॥ १४ ॥
माहायेत्न सावधपणें । समई धारिष्ट धरणें ।
अद्भूतचि कार्य करणें । देणें ईश्वराचें ॥ १५ ॥
येश कीर्ति प्रताप महिमा । उत्तम गुणासी नाहीं सीमा ।
नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥ १६ ॥
देव ब्राह्मण आचार विचार । कितेक जनासी आधार ।
सदा घडे परोपकार । देणें ईश्वराचें ॥ १७ ॥
येहलोक परलोक पाहाणें । अखंड सावधपणें राहाणें ।
बहुत जनाचें साहाणें । देणें ईश्वराचें ॥ १८ ॥
देवाचा कैपक्ष घेणे । ब्रह्माणाची चिंता वाहाणें ।
बहु जनासी पाळणें । देणें ईश्वराचें ॥ १९ ॥
धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।
जाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥ २० ॥
उत्तम गुणाचा ग्राहिक । तर्क तीक्षण विवेक ।
धर्मवासना पुण्यश्लोक । देणें ईश्वराचें ॥ २१ ॥
सकळ गुणांमधें सार । तजविजा विवेक विचार ।
जेणें पाविजे पैलपार । अरत्रपरत्रींचा ॥ २२ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
उत्तमपुरुषनिरूपणनाम समास सहावा ॥ ६ ॥ १८.६

समास सातवा : जनस्वभावनिरूपण

॥ श्रीराम ॥

जनाचा लालची स्वभाव । आरंभीं म्हणती देव ।
म्हणिजे मला कांहीं देव । ऐसी वासना ॥ १ ॥
कांहींच भक्ती केली नस्तां । आणी इछिती प्रसन्नता ।
जैसें कांहींच सेवा न करिता । स्वामीस मागती ॥ २ ॥
कष्टेंविण फळ नाहीं । कष्टेंविण राज्य नाहीं ।
केल्याविण होत नाहीं । साध्य जनीं ॥ ३ ॥
आळसें काम नासतें । हें तों प्रत्ययास येतें ।
कष्टाकडे चुकावितें । हीन जन ॥ ४ ॥
आधीं कष्टाचें दुःख सोसिति । ते पुढें सुखाचें फळ भोगिती ।
आधीं आळसें सुखावती । त्यासी पुढें दुःख ॥ ५ ॥
येहलोक अथवा परलोक । दोहिंकडे सारिखाच विवेक ।
दीर्घ सूचनेचें कौतुक । कळलें पाहिजे ॥ ६ ॥
मेळविती तितुकें भक्षिती । ते कठीण काळीं मरोन जाती ।
दीर्घ सूचनेनें वर्तती । तेचि भले ॥ ७ ॥
येहलोकींचा संचितार्थ । परलोकींचा परमार्थ ।
संचितेंविण वेर्थ । जीत मेलें ॥ ८ ॥
येकदां मेल्यानें सुटेना । पुन्हा जन्मोजन्मीं यातना ।
आपणास मारी वांचविना । तो आत्महत्यारा ॥ ९ ॥
प्रतिजन्मीं आत्मघात । कोणें करावें गणीत ।
याकारणें जन्ममृत्य । केवी चुके ॥ १० ॥
देव सकळ कांहीं करितो । ऐसें प्राणीमात्र बोलतो ।
त्याचे भेटीचा लाभ तो । अकस्मात जाला ॥ ११ ॥
विवेकाचा लाभ घडे । जेणें परमात्मा ठाई पडे ।
विवेक पाहातां सांपडे । विवेकीं जनीं ॥ १२ ॥
देव पाहातां आहे येक । परंतु करितो अनेक ।
त्या अनेकास येक । म्हणों नये कीं ॥ १३ ॥
देवाचें कर्तुत्व आणि देव । कळला पाहिजे अभिप्राव ।
कळल्याविण कितेक जीव । उगेच बोलती ॥ १४ ॥
उगेच बोलती मूर्खपणें । शाहाणपण वाढायाकारणें ।
त्रृप्तिलागीं उपाव करणें । ऐसें जालें ॥ १५ ॥
जेहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले ।
येर ते बोलतचि राहिले । करंटे जन ॥ १६ ॥
करंट्याचें करंट लक्षण । समजोन जाती विचक्षण ।
भल्याचें उत्तम लक्षण । करंट्यास कळेना ॥ १७ ॥
त्याची पैसावली कुबुद्धी । तेथें कैंची असेल शुद्धी ।
कुबुद्धी तेचि सुबुद्धी । ऐसी वाटे ॥ १८ ॥
मनुष्य शुद्धीस सांडावें । त्याचें काये खरें मानावें ।
जेथें विचाराच्या नावें । सुन्याकार ॥ १९ ॥
विचारें येहलोक परलोक । विचारें होतसे सार्थक ।
विचारें नित्यानित्य विवेक । पाहिला पाहिजे ॥ २० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
जनस्वभावनिरूपणनाम समास सातवा ॥ ७ ॥ १८.७

समास आठवा : अंतर्देवनिरूपण

॥ श्रीराम ॥

ब्रह्म निराकार निश्चळ । आत्म्यास विकार चंचळ ।
तयास म्हणती सकळ । देव ऐसें ॥ १ ॥
देवाचा ठावचि लागेना । येक देव नेमस्त कळेना ।
बहुत देवीं अनुमानेना । येक देव ॥ २ ॥
म्हणोनी विचार असावा । विचारें देव शोधावा ।
बहुत देवांचा गोवा । पडोंचि नये ॥ ३ ॥
देव क्षत्रीं पाहिला । त्यासारिखा धातूचा केला ।
पृथ्वीमधें दंडक चालिला । येणें रीतीं ॥ ४ ॥
नाना प्रतिमादेवांचें मूळ । तो हा क्षत्रदेवचि केवळ ।

नाना क्षत्रें भूमंडळ । शोधून पाहावें ॥ ५ ॥
क्षत्रदेव पाषाणाचा । विचार पाहातां तयाचा ।
तंत लागला मुळाचा । अवताराकडे ॥ ६ ॥
अवतारी देव संपले । देहे धरुनी वर्तोन गेले ।
त्याहून थोर अनुमानले । ब्रह्मा विष्णु महेश ॥ ७ ॥
त्या तिही देवांस ज्याची सत्ता । तो अंतरात्माचि पाहातां ।
कर्ता भोक्ता तत्वता । प्रतक्ष आहे ॥ ८ ॥
युगानयुगें तिन्ही लोक । येकचि चालवी अनेक ।
हा निश्चयाचा विवेक । वेदशास्त्रीं पाहावा ॥ ९ ॥
आत्मा वर्तवितो शरीर । तोचि देव उत्तरोत्तर ।
जाणीवरूपें कळिवर । विवेकें वर्तवी ॥ १० ॥
तो अंतर्देव चुकती । धांवा घेऊन तीर्था जाती ।
प्राणी बापुडे कष्टती । देवास नेणतां ॥ ११ ॥
मग विचारिती अंतःकर्णीं । जेथें तेथें धोंडा पाणी ।
उगेंचि वणवण हिंडोनि । काये होतें ॥ १२ ॥
ऐसा ज्यासी विचार कळला । तेणें सत्संग धरिला ।
सत्संगें देव सांपडला । बहुत जनासी ॥ १३ ॥
ऐसीं हे विवेकाचीं कामें । विवेकी जाणतील नेमें ।
अविवेकी भुलले भ्रमें । त्यांस हें कळेना ॥ १४ ॥
अंतरवेधी अंतर जाणे । बाहेरमुद्रा कांहींच नेणें ।
म्हणोन विवेकी शाहणे । अंतर शोधिती ॥ १५ ॥
विवेकेंविण जो भाव । तो भावचि अभाव ।
मुर्खस्य प्रतिमा देव । ऐसें वचन ॥ १६ ॥
पाहात समजत सेवटा गेला । तोचि विवेकी भला ।
तत्वें सांडुनी पावला । निरंजनीं ॥ १७ ॥
आरे जें आकारासी येतें । तें अवघेंच नासोन जातें ।
मग गल्बल्यावेगळें तें । परब्रह्म जाणावें ॥ १८ ॥
चंचळ देव निश्चळ ब्रह्म । परब्रह्मीं नाहीं भ्रम ।
प्रत्ययज्ञानें निभ्रम । होईजेतें ॥ १९ ॥
प्रचीतीविण जें केलें । तें तें अवघें वेर्थ गेलें ।
प्राणी कष्टकष्टोंचि मेलें । कर्मकचाटें ॥ २० ॥
कर्मावेगळें न व्हावें । तरी देवास कासया भजावें ।
विवेकी जाणती स्वभावें । मूर्ख नेणे ॥ २१ ॥
कांहीं अनुमानलें विचारें । देव आहे जगदांतरें ।
सगुणाकरितां निर्धारें । निर्गुण पाविजे ॥ २२ ॥
सगुण पाहातां मुळास गेला । सहजचि निर्गुण पावला ।
संगत्यागें मोकळा जाला । वस्तुरूप ॥ २३ ॥
परमेश्वरीं अनुसंधान । लावितां होईजे पावन ।
मुख्य ज्ञानेंचि विज्ञान । पाविजेतें ॥ २४ ॥
ऐसीं हे विवेकाचीं विवर्णें । पाहावीं सुचित अंतःकर्णें ।
नित्यानित्य विवेकश्रवणें । जगदोधार ॥ २५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
अंतर्देवनिरूपणनाम समास आठवा ॥ ८ ॥ १८.८

समास नववा : निद्रानिरूपण

॥ श्रीराम ॥

वंदूनियां आदिपुरुष । बोलों निद्रेचा विळास ।
निद्रा आलियां सावकास । जाणार नाहीं ॥ १ ॥
निद्रेनें व्यापिली काया । आळस आंग मोडे जांभया ।
तेणेंकरितां बैसावया । धीर नाहीं ॥ २ ॥
कडकडां जांभया येती । चटचटां चटक्या वाजती ।
डकडकां डुकल्या देती । सावकास ॥ ३ ॥
येकाचे डोळे झांकती । येकाचे डोळे लागती ।
येक ते वचकोन पाहाती । चहुंकडे ॥ ४ ॥
येक उलथोन पडिले । तिहीं ब्रह्मविणे फोडिले ।
हुडकाचे टुकडे जाले । सुधी नाहीं ॥ ५ ॥
येक टेंकोन बैसले । तेथेंचि घोरों लागले ।
येक उताणे पसरलें । सावकास ॥ ६ ॥
कोणी मुकुंडी घालिती । कोणी कानवडें निजती ।
कोणी चक्रीं फिरती । चहुंकडे ॥ ७ ॥
येक हात हालविती । येक पाये हालविती ।
येक दांत खाती । कर्कराटें ॥ ८ ॥
येकांचीं वस्त्रें निघोनि गेलीं । ते नागवींच लोळों लागलीं ।
येकाचीं मुंडासीं गडबडलीं । चहुंकडे ॥ ९ ॥
येक निजेलीं अव्यावेस्तें । येक दिसती जैसीं प्रेते ।
दांत पसरुनी जैसीं भूतें । वाईट दिसती ॥ १० ॥
येक वोसणतचि उठिले । येक अंधारीं फिरों लागले ।
येक जाऊन निजेले । उकरड्यावरी ॥ ११ ॥
येक मडकीं उतरिती । येक भोई चांचपती ।
येक उठोन वाटा लागती । भलतीकडे ॥ १२ ॥
येक प्राणी वोसणाती । येक फुंदफुंदों रडती ।
येक खदखदां हासती । सावकास ॥ १३ ॥
येक हाका मारूं लागले । येक बोंबलित उठिले ।
येक वचकोन राहिले । आपुले ठाईं ॥ १४ ॥
येक क्षणक्षणा खुरडती । येक डोई खाजविती ।
येक कढों लागती । सावकास ॥ १५ ॥
येकाच्या लाळा गळाल्या । येकाच्या पिका सांडल्या ।
येकीं लघुशंका केल्या । सावकास ॥ १६ ॥
येक राउत सोडिती । येक कर्पट ढेंकर देती ।
येक खांकरुनी थुंकिती । भलतीकडे ॥ १७ ॥
येक हागती येक वोकिती । येक खोंकिती येक सिंकिती ।
येक ते पाणी मागती । निदसुऱ्या स्वरें ॥ १८ ॥
येक दुस्वप्नें निर्बुजले । येक सुस्वप्नें संतोषले ।
येक ते गाढमुढी पडिले । सुषुप्तिमधें ॥ १९ ॥
इकडे उजेडाया जालें । कोण्हीं पढणें आरंभिलें ।
कोणीं प्रातस्मरामि मांडिलें । हरिकिर्तन ॥ २० ॥
कोणीं आठविल्या ध्यानमूर्ति । कोणी येकांतीं जप करिती ।

कोणी पाठांतर उजळिती । नाना प्रकारें ॥ २१॥
नाना विद्या नाना कळा । आपलाल्या सिकती सकळा ।
तानमानें गायेनकळा । येक गाती ॥ २२॥
मागें निद्रा संपली । पुढें जागृती प्राप्त जाली ।
वेवसाई बुद्धी आपुली । प्रेरिते जाले ॥ २३॥
ज्ञाता तत्वें सांडून पळाला । तुर्येपैलिकडे गेला ।
आत्मनिवेदनें जाला । ब्रह्मरूप ॥ २४॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
निद्रानिरूपणनाम समास नववा ॥ ९॥ १८.९

समास दहावा : श्रोताअवलक्षणनिरूपण
॥ श्रीराम ॥
कोणीयेका कार्याचा साक्षप । कांहीं तऱ्ही घडे विक्षेप ।
काळ साहे तें आपेंआप । होत जातें ॥ १॥
कार्यभाग होत चालिला । तेणें प्राणी शोक जाला ।
विचारहि सुचों लागला । दिवसेंदिवस ॥ २॥
कोणीयेक प्राणी जन्मासी येतो । कांहीं तऱ्ही काळ साहे होतो ।
दुःखाउपरी सुख देतो । देव कृपाळुपणें ॥ ३॥
अवघाचि काळ जरी सजे । तरी अवघेचि होती राजे ।
कांहीं सजे कांहीं न सजे । ऐसें आहे ॥ ४॥
येहलोक अथवा परलोक । साधतां कोणीयेक विवेक ।
अद्भूत होये स्वाभाविक । देणें ईश्वराचें ॥ ५॥
ऐकल्याविण कळलें । सिकविल्याविण शहाणपण आलें ।
देखिलें ना ऐकिलें । भूमंडळीं ॥ ६॥
सकळ कांहीं ऐकतां कळे । कळतां कळतां वृत्ति निवळे ।
नेमस्त मनामधें आकळे । सारासार ॥ ७॥
श्रवण म्हणिजे ऐकावें । मनन म्हणिजे मनीं धरावें ।
येणें उपायें स्वभावें । त्रयलोक्य चाले ॥ ८॥
श्रवणाआड विक्षेप येती । नाना जिनस सांगो किती ।
सावध असतां प्रत्यय येती । सकळ कांहीं ॥ ९॥
श्रवणीं लोक बैसले । बोलतां बोलतां येकाग्र जाले ।
त्याउपरी जे नूतन आले । ते येकाग्र नव्हेती ॥ १०॥
मनुष्य बाहेर हिंडोनी आलें । नाना प्रकारीचें ऐकिलें ।
उदंड गलबलूं लागलें । उगें असेना ॥ ११॥
प्रसंग पाहोन चालती । ऐसे लोक थोडे असती ।
श्रवणीं नाना विक्षेप होती । ते हे ऐका ॥ १२॥
श्रवणीं बैसले ऐकाया । अडों लागलीसें काया ।
येती कडकडां जांभया । निद्राभरें ॥ १३॥
बैसले सुचित करूनि मना । परी तें मनचि ऐकेना ।
मागें होतें ऐकिलें नाना । तेंचि धरुनी बैसलें ॥ १४॥
तत्पर केलें शरीर । परी मनामधें आणीक विचार ।
कल्पना कल्पी तो विस्तार । किती म्हणौनि सांगावा ॥ १५॥
जें जें कांहीं श्रवणीं पडिलें । तितुकें समजोन विवरलें ।
तरीच कांहीं सार्थक जालें । निरूपणीं ॥ १६॥
मन दिसतें मां धरावें । ज्याचें त्यानें आवरावें ।
आवरून विवेकें धरावें । अर्थांतरीं ॥ १७॥
निरूपणीं येऊन बैसला । परी तो उदंड जेऊन आला ।
बैसतांच कासाविस जाला । त्रुषाकांत ॥ १८॥
आधीं उदक आणविलें । घळघळां उदंड घेतलें ।
तेणें मळमळूं लागलें । उठोनी गेला ॥ १९॥
कर्पट ढेंकर उचक्या देती । वारा सरतां मोठी फजिती ।
क्षणक्षणा उठोनी जाती । लघुशंकेसी ॥ २०॥
दिशेनें कासाविस केला । आवघेंचि सांडून धांविला ।
निरूपणप्रसंगीं निघोन गेला । अखंड ऐसा ॥ २१॥
दृष्टांती कांहीं अपूर्व आलें । अंतःकर्ण तेथेंचि राहिलें ।
कोठवरी काये वाचिलें । कांहीं कळेना ॥ २२॥
निरूपणीं येऊन बैसला । तो विंचुवें फणकाविला ।
कैचें निरूपण जाला । कासाविस ॥ २३॥
पोटामधें तिडिक उठिली । पाठीमधें करक भरली ।
चालक चिखल्या पुळी जाली । बैसवेना ॥ २४॥
पिसोळा चाऊन पळाला । तेणें प्राणी दुश्चीत जाला ।
कोणें नेटें गल्बला केला । तेथेंचि धावें ॥ २५॥
विषइ लोक श्रवणीं येती । ते बायेकांकडेच पाहाती ।
चोरटे लोक चोरून जाती । पादरक्षा ॥ २६॥
होये नव्हे वादवेवाद । तेणें उदंड जाला खेद ।
सिव्या गाळी अप्रमाद । होतां चुकला ॥ २७॥
कोणी निरूपणीं बैसती । सावकस गोष्टी लाविती ।
हरिदास ते रें रें करिती । पोटासाठीं ॥ २८॥
बहुत जाणते मिळाले । येकापुढें येक बोले ।
लोकांचे आशये राहिले । कोण जाणे ॥ २९॥
माझें होये तुझें नव्हे । ऐसी अखंड जयास सवे ।
न्याये नीति सांडून धावे । अन्यायाकडे ॥ ३०॥
आपल्य थोरपणासाठीं । अच्यावाच्या तोंड पिटी ।
न्याये नाहीं ते सेवटीं । परम अन्याई ॥ ३१॥
येकेकडे अभिमान उठे । दूसरेकडे उदंड पेटे ।
ऐसे श्रोते खरे खोटे । कोण जाणे ॥ ३२॥
म्हणोन जाणते विचक्षण । तें आधींच धरिती नेणेपण ।
मूर्ख टोणपा आपण । कांहींच नाहीं ॥ ३३॥
आपणाहून देव थोर । ऐसा जयास कळला विचार ।
सकळ कांहीं जगदांतर । तेहिं राखावें ॥ ३४॥
सभेमधें कळहो जाला । शब्द येतो जाणत्याला ।
अंतरें राखों नाहीं सिकला । कैसा योगी ॥ ३५॥
वैर करितां वैरचि वाढे । आपणास दुःख भोग्णें घडे ।
म्हणोनि शाहाण्याचे कुकडे । कळों आलें ॥ ३६॥
अखंड आपणा सांभळिती । क्षुल्लकपण येऊं नेदिती ।
थोर लोकांस क्षमा शांति । अगत्य करणें ॥ ३७॥
अवगुणापासीं बैसला गुणी । आवगुण कळतो ततक्षणीं ।

विवेकी पुरुषाची करणी । विवेकें होते ॥ ३८॥
उपाये परियाये दीर्घ प्रेत्न । विवेकबळें नाना येत्न ।
करील तयाचें महिमान । तोचि जाणे ॥ ३९॥
दुर्जनीं वेवदरून घेतला । बाश्कळ लोकीं घसरिला ।
विवेकापासून चेवला । विवेकी कैसा ॥ ४०॥
न्याये परियाये उपाये । मूर्खास हें कळे काये ।
मूर्खाकरितां चिवडा होये । मज्यालसीचा ॥ ४१॥
मग ते शाहाणे नीट करिती । स्वयें साहोन साहविती ।
स्वयें करून करविती । लोकांकरवीं ॥ ४२॥
पृथ्वीमधें उदंड जन । जनामधें असती सज्जन ।
जयांकरितां समाधान । प्राणीमात्रासी ॥ ४३॥
तो मनोगतांचीं आंगें जाणे । मान प्रसंग समये जाणे ।
संतप्तालागीं निवऊ जाणे । नाना प्रकारें ॥ ४४॥
ऐसा तो जाणता लोक । समर्थ तयाचा विवेक ।
त्याचें करणें कांहिं येक । जनास कळेना ॥ ४५॥
बहुत जनास चालवी । नाना मंडळें हालवी ।
ऐसी हे समर्थपदवी । विवेकें होते ॥ ४६॥
विवेक येकांती करावा । जगदीश धारणेनें धरावा ।
लोक आपला आणी परावा । म्हणोंचि नये ॥ ४७॥
येकांती विवेक ठाई पडे । येकांतीं येत्न सांपडे ।
येकांतीं तर्क वावडे । ब्रह्मांडगोळीं ॥ ४८॥
येकांती स्मरण करावें । चुकलें निधान पडे ठावें ।
अंतरात्म्यासरिसें फिरावें । कांहीं तरी ॥ ४९॥
जयास येकांत मानला । अवघ्या आधीं कळे त्याला ।
त्यावेगळें वडिलपणाला । ठावचि नाहीं ॥ ५०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
श्रोताअवलक्षणनिरूपणनाम समास दहावा ॥ १०॥ १८.१०
॥ दशक अठरावा समाप्त ॥

Encoded and proofread by Vishwas Bhide.
Reproofread by P. D. Kulkarni